अग्रलेखांचा नवाकाळ बादशहा

संस्थापक : नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

नवाकाळ

।। न मे भक्त: प्रणश्यति ।।

अग्रलेखांचा नवाकाळ बादशहा

# पाणबुड्यांचे अपघात नौदलावर आघात

गेल्या वर्षभरामध्ये नौदलामध्ये झालेले अपघात देशाच्या संरक्षण व्यवस्थेविषयी चिंता निर्माण करतात. गेल्या आठवड्यात कोलकाता या पाणबुडीवर वायू गळती होऊन त्यात एक जण मृत्यूमुखी पडला. त्यापूर्वी सिंधुरक्षक पाणबुडीवर झालेला अपघात नौदलाला सुध्दा धक्का देणारा ठरला होता. सलग आठ महिन्यांमध्ये आठ अपघात होऊन नौदलाची प्रतिमाच डागाळली गेली. जे नौदल स्वत:च्या पाणबुड्यांचे, स्वत:च्या जहाजाचे किंवा स्वत:च्या साधनसामुग्रीचे संरक्षण करू शकत नसेल ते नौदल देशाच्या सागरी किनाऱ्याचे किंवा देशाचे कसे काय संरक्षण करेल असा अतिशय साधा प्रश्न उपस्थित होतो. सतत हे अपघात झाल्यामुळे त्याची नैतिक जबाबदारी स्वीकारून नौदल प्रमुख डी. आर. जोशी यांनी राजीनामा देण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला. भारताच्या नौदलाच्या कारकिर्दीत अशा प्रकारे नौदल प्रमुखांना राजीनामा देण्याची कधीही वेळ आली नाही हा प्रकार पहिल्यांदाच घडला. यावरून नौदलाच्या एकूण क्षमतेविषयी आणि संरक्षण सिध्दतेविषयी प्रश्नचिन्ह निर्माण होते. खरे तर वारंवार होणारे हे अपघात केवळ अपघात आहेत. म्हणून सोडून देता येणार नाहीत. त्यामागे घातपात असल्याची देखील तितकीच दाट शक्यता आहे. गेल्या आठवड्यात सिंधुरक्षक पाणबुडीचा अपघात झाला त्यावेळी आम्ही हीच शंका उपस्थित केली होती. कारण ज्यावेळेला लागोपाठ अपघात होतात त्यावेळेला त्याभोवती संशयाचे धुके निर्माण होते. जाणूनबुजून हा प्रकार कोणीतरी घडवून आणण्याची शक्यता दिसून येते. कारण सध्याची परिस्थिती इतकी अस्थिर आहे की, दहशतवादी किंवा शत्रू राष्ट्र कोणत्या थराला जाऊन कारस्थान करू शकते. ज्यामार्गाने शक्य होईल त्यामार्गाने भारतामध्ये अस्थिरता निर्माण करायची, संरक्षण व्यवस्थेविषयी संभ्रम निर्माण करायचा आणि आपला हेतू साध्य करायचा असा प्रकार घडू शकतो म्हणूनच नौदलावर वारंवार येत असलेले संकट एका मोठया कारस्थानाचा भाग आहे का? याची चौकशी झाली पाहिजे. अपघात म्हणून स्वत:चीच समजूत करून न घेता अधिक व्यापक दृष्टीने हा कोणत्या कटाचा भाग नाही ना याचा अंदाज घेणे गरजेचे आहे.

### मुंबई बंदरात चाचेगिरीची वाढ

आज या घटना होऊनसुध्दा संरक्षण मंत्रालय जागे झालेले नाही. या अपघातांची कठोरपणे चौकशी सुरू झालेली नाही. चौकशी सुरूही असली तरी भविष्यकाळात असे अपघात होणार नाहीत याची खात्री नौदल किंवा संरक्षण मंत्रालय देऊ शकत नाही अशी आज परिस्थिती आहे. नौदल प्रमुखांनी ज्या कारणासाठी राजीनामा दिला त्याचा तर आज कोणीच विचार करताना दिसत नाही. नौदलाच्या ताफ्यात असलेल्या पाणबुड्या २० वर्ष जुन्या आहेत त्या तातडीने बदल्या पाहिजेत. जुन्या पाणबुड्या किती दिवस सांभाळायच्या अशा प्रकारची चिंता नौदल प्रमुखच ज्यावेळेला व्यक्त करतात. त्यावेळेला नौदलाकडे संरक्षण मंत्रालयाचे दुर्लक्ष झालेले आहे हे आपोआप स्पष्ट होते. भारत हा देश तिन्ही बाजूंनी समुद्रानी वेढलेला आहे. इथले नौदल अत्यंत कार्यक्षम असणे गरजेचे आहे. जेवढे महत्त्व वायूदलाला किंवा भूदलाला आहे त्यापेक्षा जास्त लक्ष नौदलाकडे दिले पाहिजे, अरबी समुद्र, बंगालचा उपसागर किंवा खालचा हिंद महासागर या तीनही बाजूचा विचार केला, तर कितीतरी मोठा प्रदेश नौदलाच्या हद्दीत येतो. म्हणजेच या सगळया ठिकाणी नौदलाला डोळ्यात तेल घालून पहारा ठेवणे गरजेचे आहे. अशा परिस्थितीत जर जुन्या पुराण्या पाणबुड्या किंवा जहाजे नौदलाच्या ताफ्यात असतील तर त्याचा नौदलाच्या कार्यक्षम तेवर निश्चितच परिणाम होईल आणि अशा ढिसाळ कारभाराचा दहशतवादी किंवा हितशत्रू त्याचा सहजपणे गैरफायदा घेऊ शकतात. एका मोठ्या गंभीर समस्येकडे स्वत: नौदल प्रमुखांनी सरकारचे लक्ष वेधले असताना त्याची जर तितक्याच तातडीने दखल घेतली गेली नाही, तर त्याची देशालाच किंमत मोजावी लागेल. मग जे काही नुकसान होईल त्याचा दोष केवळ नौदलाला देण्यात काहीच अर्थ राहणार नाही. जगातल्या अन्य देशांमधल्या नौदलाची आधुनिकता पाहिली तर भारताला बराच मोठा पल्ला गाठायचा आहे असे म्हणावे लागते. शेजारचे चीन राष्ट्र कदाचित याच कमकुवतपणाचा गैरफायदा घेऊन बंगालच्या उपसागरात आणि हिंद महासागरातसुध्दा आपली जहाजे घुसविण्याचे कारस्थान करीत असावे. इकडे पाणबुड्या सांभाळणे नौदलाला शक्य होत नाही तर दुसरीकडे देशाच्या सागरी सीमांचे संरक्षण करणे आणखीनच दुरापास्त होत जाईल. देशाच्या संरक्षण सिध्दतेविषयी तीनही दलांचे प्रमुख आपण कोणत्याही संकटांशी सामना करण्याकरता सिध्द आहोत अशा प्रकारचा आत्म विश्वास व्यक्त करतात. तो करणे त्यांना आवश्यकही आहे. परंतु प्रत्यक्षात वस्तुस्थिती काय हे पहायला गेले तर पाणबुड्यांच्या या अपघातांवरून या आत्मविश्वासातला पोकळपणाही नजरेत भरतो.

### निवडणुकांमुळे नौदल आणखी अडचणीत

येणारा काळ आणखीनच संकटाचा आहे. केवळ शेजारी राष्ट्रच नव्हे तर अमेरिका रशिया यांच्या नौदलाच्या गस्ती नौका देखील भारताच्या आजूबाजूला घिरट्या घालत आहेत. आणखीनच एक महत्त्वाचा मुद्दा असा की, मुंबई किनाऱ्यावर नौदलाचे सर्वाधिक अपघात होत आहे आणि त्याच वेळी गेल्या वर्षभरात मुंबई जवळच्या समुद्रातच चाचेगिरी करणाऱ्या नौकाही पकडल्या गेल्या. तस्करी आणि सागरी नौकावर हल्ले करणाऱ्या काही टोळ्या समुद्रामध्ये वावरत असतात. गेल्या वर्षभरात मुंबईजवळ अशी तीन छोटी जहाजे पकडली गेली तर चार वर्षांपूर्वी एक भले मोठे जहाज भरकटत मुंबईच्या किनाऱ्यावर येऊन आदळले होते. काही दिवसांपूर्वी तर दहशतवादी समुद्रमार्गाने मुंबईवर पुन्हा हल्ला करण्याची शक्यता गुप्तचर यंत्रणांनी वर्तवली होती. असा सगळा चारी बाजूंनी धोक्याचाच इशारा असतानाच नौदलातच जर अपघातांचे तांडव सुरू झाले तर मोठाच प्रश्न निर्माण होऊ शकतो. नौदलाच्या नाकातोंडात पाणी जाणार नाही एवढी तरी काळजी सरकार दरबारी बसलेल्या नोकरशहांनी घ्यायला हवी. राजकारण्यांना तर सध्या देशाच्या कोणत्याच प्रमुख प्रश्नाकडे लक्ष घायला वेळ नाही. सत्ता हडपण्यासाठी त्यांचा आटापिटा सुरू झाला आहे. म्हणजे पुढचा एक ते दीड महिना नौदलाच्या या समस्यांविषयी कोणताच तातडीने निर्णय होणार नाही, हे स्पष्टपणे दिसते.